**ISSN 2277 - 5730**

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL**

# AJANTA

**Volume - XI** **Issue - I** **January - March - 2022**

**ENGLISH / MARATHI PART - I**

**Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal**

**Journal No. 40776**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2019 - 6.399**
**www.sjifactor.com**

**❖ EDITOR ❖**

**Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

**❖ PUBLISHED BY ❖**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** **(www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. Shrikrishna S. Bal**
I/C Principal (Retd.),
Head, Department of Psychology,
D.B.J.College, Chiplun, Dist. Ratnagiri (M.S.)

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH PART - I



| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Domestic Violence - An Analysis<br>**Mr. Dharmender**<br>**Adv. Reena Pareek** | 1-8 |
| 2 | Women: Prisoners of Matrimony as Reflected in Feminine Writings<br>**Dr. Veena Ilame** | 9-13 |
| 3 | A Comparative Study of Indian Banking System and Yemen Banking System<br>**Prof. Dr. Mahavir N. Sadavarte**<br>**Mr. Emad Abdulrahman Farea Mohammed** | 14-21 |
| 4 | Financial Inclusion: Solution for Banking Shadow<br>**Dr. D. S. Rangacharya** | 22-27 |
| 5 | The Paradigm of the Farm Laws Repeal Act 2021: An Analysis<br>**Dr. Gobinda Chandra Sethi** | 28-32 |
| 6 | The Citizenship Act, 1955: An Analytical Study<br>**Ravi**<br>**Dr. Anil Kumar** | 33-37 |
| 7 | Hitherto Unreported Ethno-Medicinal Plants of Darjeeling Himalayan Region (India)<br>**Tembhurne R. R.** | 38-46 |
| 8 | Challenge to Maintain Physical Fitness and Wellness withinside the 21$^{st}$ Century<br>**Dr. Meenakshi** | 47-52 |
| 9 | Re-Engineering Library Services in Academic Libraries at Digital Era<br>**Sudhir B. Sangole** | 53-58 |
| 10 | Fly Ash Quality and its Impacts on Gram (*Cicer arietinum,* L.) Growth<br>**Prachi P. Donge**<br>**Prabha V. Barde**<br>**Dr. S. L. Pal** | 59-67 |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | अभिजित बॅनर्जी यांचे अर्थशास्त्रीय विचार<br>**डॉ. वैशाली धनराज पाटील** | १-६ |
| २ | कौटुंबिक हिंसाचार : हुंडाप्रथा एक सामाजिक समस्या<br>**प्रा. पवळ रंजना भिमराव** | ७-११ |
| ३ | बोरबेटची मोरजाई देवी गुहा - सती गमनस्थान : मुलस्वरूपाचा शोध<br>**डॉ. रामचंद्र गुर्लिंग घुले** | १२-२० |
| ४ | समान नागरी कायदा - एक अध्ययन<br>**डॉ. आर. पी. करोडकर** | २१-२५ |
| ५ | माणसाच्या प्रवाही अनुभवाचे मानसशास्त्रीय आकलन<br>**डॉ. एन. एस. डोंगरे** | २६-३१ |
| ६ | महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक, सामाजिक कार्य, संशोधनात्मक अभ्यास<br>**जयश्री सोनकवडे-जाधव** | ३२-४० |
| ७ | कोरोना व्हायरसचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>**प्रा. सोनकांबळे देवराव नामदेव** | ४१-४६ |
| ८ | राजर्षी शाहू महाराज कालीन सामाजिक परिस्थिती<br>**प्रा. रामचंद्र गायकवाड** | ४७-५० |
| ९ | भारतीय लोकशाहीतील अन्य प्रवाह: भाषावाद, प्रादेशिकवाद, राष्ट्रवाद<br>**प्रा. डॉ. रमाकांत तिडके** | ५१-५५ |
| १० | पुणे करार आणि महात्मा गांधी यांची अस्पृश्यता निवारणार्थ भूमिका<br>**प्रा. डॉ. किशोर कोंड्बाजी काजळे** | ५६-६२ |
| ११ | महात्मा ज्योतीबा फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्य<br>**डॉ. चित्ररेखा अनासाने** | ६३-६७ |
| १२ | आधुनिक ग्रंथालयात क्लोज सर्किट टी.व्ही. (C.C.T.V) ची उपयुक्तता<br>**नागेश दिनकर माने** | ६८-७० |
| १३ | गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धनाच्या आधुनिक पद्धती व रोजगाराच्या विविध संधी<br>**आंबादास गजानन मेव्हणकर** | ७१-७५ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या औद्योगिक सुधारणा<br>**प्रा. भोजराज व्ही. बोदेले**<br>**डॉ. शरयू बी. तायवाडे** | ७६-७९ |
| १५ | बेबी कांबळे यांच्या - 'जिणं आमुचं' या आत्मकथनातील दलित समाजदर्शन<br>**प्रा. डॉ. दिलीप पी. पवार**<br>**अश्विनी जिवराज निकम** | ८०-८५ |

# १५. बेबी कांबळे यांच्या - 'जिणं आमुचं' या आत्मकथनातील दलित समाजदर्शन

**प्रा. डॉ. दिलीप पी. पवार**
मार्गदर्शक, (मराठी विभाग प्रमुख), मराठा विद्या प्रसारक समाजाचे, के आर.टी. आर्टस बी.एच. कॉमर्स, ॲण्ड ए.एम सायन्स के.टी.एच.एम,कॉलेज, नाशिक.
**अश्विनी जिवराज निकम**
संशोधक विद्यार्थिनी, के आर.टी. आर्टस बी.एच. कॉमर्स, ॲण्ड ए.एम सायन्स के.टी.एच.एम,कॉलेज, नाशिक.

**प्रस्तावना**

दलित स्त्रीचे पहिले आत्मकथन नेमके कोणते, याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. खुद्द आत्मकथनकार दलित स्त्रियांमध्येही याबाबत एकमत आढळत नाही. बेबी काबंळे यांनी एका ठिकाणी नमूद केले आहे की, '' 'जिणं आमचं' आत्मकथन प्रकाशित ता. २३ मे १९८६ ला झाले. हे आत्मकथन पहिले आहे.... माझं लिखाण १९८५ साली ज्यावेळेला दिवाळी अंक स्त्रीमध्ये येऊ लागले, तेव्हा माझ्या घरच्यांना कळलं, मी काहीतरी लिहिलं आहे म्हणून. शांताबाई कांबळे यांच्या पुस्तकाबद्दल मी काहीही बोलू शकत नाही. हे काम परीक्षकाचं वाचकवर्गाचं, माझं नव्हे; मी एवढंच ठाम सांगू शकेन. 'जिणं आमुचं' हे पहिलं आत्ककथन आहे.''[१] जिणं आमुचं या आत्मकथनाला प्रस्तावना लिहिताना मॅक्सीन बर्नसन यांनीही ''मराठीतले पहिले दलित स्त्रीचे आत्मचरित्र म्हणून बेबीताई यांच्या पुस्तकाला ऐतिहासिक महत्त्व आहेच,''[२] असे नमूद केले आहे. बर्नसन यांनी आत्मचरित्र हा शब्द वापरला आहे.

सौ. बेबी कांबळे यांनी लिहलेल्या 'जिण आमुच' या स्वकथनातून शिर्षकाप्रमाणेच दलित स्त्री जातीच्या जगण्याचे चित्रण केलेले आहे. कारण पन्नास वर्षापूर्वीच्या दलित स्त्रीचे जीवन एकमेकींपासून पुर्णपणे वेगळे असे नव्हतेच. बेबी कांबळे याचा जन्म इ.स. १९२९ रोजी पुरंदर तालुक्यातील विरगाव येथे झाला. त्यांचे बालपण त्यांच्या आजोळी गेले. बेबीताईंचे आजोबा बटलर होते. वडिल पंढरीनाथ हे ठेकेदार होते. बेबीताईंचे शिक्षण फलटन येथे झाले. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह कोंडिबा कांबळे यांच्यासोबत झाला. विवाहानंतर त्यांनी त्यांच्या मुलांना ही शिक्षण दिले. इतकीच माहीती बेबीताईंनी स्वत:विषयी दिली आहे. त्यांच्या आत्मकथनातून स्व पेक्षा समाजदर्शन दिसते. लेखिकेच्या वैयक्तिक जीवनातील परिवर्तनाच्या टप्प्यांशी निगडित दोन-चार प्रसंग आले आहेत. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व महार समाजाची स्थिती आणि त्यांच्या आगमनानंतर घडून आलेले परिवर्तन याविषयीचे विस्तृत चित्रण करुन पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणाची आवश्यकता त्यांनी नमूद केली आहे.१९१८ सालापासून ते वर्तमानकालीन स्थितीगतीचे विस्तृत चित्रण 'जिण आमुच' मधुन दिसून येते. बेबी कांबळे विषयी डॉ. प्रा. मदन कुलकर्णी लिहितात, ''लेखिकेने स्व समाजाला केंद्रस्थानी

ठेवले आहे. याची जाणीव'' स्वत: बेबी कांबळे यांनाही आहे.म्हणूनच त्यांनी निवेदनात ''लाखो वर्ष गुलामगिरीच्या बेड्या हातात अडकवून जगणारी खरीखुरी देशाची लेकरं कसल्या अग्निदिव्यातून बाहेर पडली आहेत. हे भावी पिढीला कळायला हवे असे स्पष्टच म्हटले आहे. आपल्या या निवेदनाशी त्या प्रामाणिकही राहिल्या आहेत हे महत्त्वाचे आहे.वाड्मय म्हणून हे पुस्तक कमी दर्जाचे वाटले तरी समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकारांच्या दृष्टीने या पुस्तकाचे मोल निश्चितच श्रेष्ठ ठरणारे आहे.''[३]

प्रस्तुत आत्मकथनातील महत्त्वाचा भाग म्हणजे त्यावेळच्या महार जीवनाचे चित्र पाच सहा वर्षांच्या मुलींचे लग्ने, त्यांचा सासरी होणारा छळ, वयात आलेली सुन आणि मुलगा, यांच्यात दुरावा म्हणून सासूबाई करीत असलेली अनन्विन प्रकार, पळून गेलेल्या सुनेला परत आणून तिच्या पायात खोडा घालण्यात येणे आणि काही वेळा तिचे नाकही कापण्याची क्रुर प्रथा ह्या गोष्टीचे बेबीताईंनी केलेले तपशिलवार वर्णन भारतातील स्त्री जीवन आणि भारतीय समाजमन ह्यावर विदारक प्रकाश टाकणारे आहे. बेबीताईंच्या दृष्टीकोनात आत्मियता आणि तटस्थता ह्यांचे संतुलित मिश्रण असल्यामुळे ओंगळ किंवा किळसवाण्या गोष्टीत सुध्दा त्यांना गंमत वाटते. सतत शेंबडाचा नळ वाहत असणारी लहान पोरे त्यांना विशेष गमतीदार वाटतात. आषाढ महिन्याची जीव घेणी अंघोळ, आईच्या उवालिखांनी भरलेल्या लुगड्याचे धुणे, ह्या प्रसंगाची वर्णने विनोदी आहेत. तसेच भयानक दारिद्र्यात राहणारा महार स्वत:च्या कुटुंबातल्या माणसाबद्दल.... बोलताना ''राजा''.. ''राणी''... ''राजपुत्र'', असे शब्द वापरुन विनोद आणि कल्पकतेच्या सहाय्याने परिस्थितीवर कसा मात करतो हे बेबीताईंनी अनेक किस्यामधून दाखविले आहे. आपल्या समाजाला रुढींनी ग्रासून टाकल्यामुळे अंगारे,धुपारे देवदेवर्षी याचेच महत्त्व कसे वाढत होते हे त्यांनी सांगितले. शिवाय अंगात येणे, पोतराज सोडणे यासारख्या खुळचट धार्मिक कृत्यात स्वत:चे दु:ख आणि लाजिरवाणे जिणे विसरणारा आपला समाज बघुन त्या दु:खी होताना दिसतात. कारण सतत होणारी उपासमार हाल त्यांनी बघितले होते. लेखिकेच्या गावातील महारवाड्यात एकूण १६ कुटुंबे होती. त्यात फक्त त्यांच्या आजोबाच सुशिक्षित होते. त्यांचे आजोबा फास्ट इंग्लिश बोलायचे कारण ते युरोपीयन साहेबांच्या सहवासात राहिलेले होते. त्यांना महिना १६ रुपये पगार होता. सोळा रुपयांचा पगारदार म्हणजे सगळ्या गावात असा कोणी नाही. सगळ्या गावात त्यांच्या नावाची आणि कामाची चर्चा होत असे. महारवाड्यातील इतरानांही त्यांची आजी सतत मदत करायची.

या पुस्तकातून तत्कालीन समाजाचे, समाज मनाचे व समाज वास्तवाचे, स्त्री-पुरुषांचे वर्णन केलेले आहे. बेबीताई यांनी वर्णन केलेला काळ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मातर करत असतांनाचा आहे. त्यामुळे दलित समाजाच्या आयुष्यातील मावळणारा हिंदू धर्म व उदयाला येणारा बौध्द धर्म असे सामाजिक अवस्थेचे ते रुप होते. स्वच्छता आणि निटनेटकेपणा औषधालाही सापडत नाही. कारण आर्थिक स्थिरता आणि सामाजिक प्रतिष्ठा इथे स्वप्नवत आहे. असे समाजजीवन शब्दबध्द करताना बेबीताई लिहितात, ''अंगावरुन गेलेले पाण्याचे ओघळ, अंगावर मळाचे थराच्या थर बसून अंगाची चामडी काळीकट्ट झालेली. तेलाविना न विंचारलेल्या झिंज्या ती झापटनाच्या रुपाने खांद्यावर पसरलेली बघणाऱ्यांना असे वाटते की, या झिंज्याना उंदराने कुरतडले असावे. केसांच्या जाळीत उवा-लिखांची बुचबूच फुफाट्यात घोळसून गेलेली

अंग, नाकात हिरव्यागार शेंबडाचा नळ,नळ म्हणजे नाकाखालील जागा शेंबूड वाहणारी त्यालाच नळाची उपमा. त्या पोरांच्या अंगावरती वीतभर सुध्दा चिंधी नसे. अशीच उघडबंब नागडी पोरे एकाएका खोपटात आठ-दहा आठ-दहा असायची. कुठ कुठं तर पंधरा-वीस पर्यत असत. मुख्य म्हणजे मोठा मुलगा आईला सोडलेला असे. त्याला पोतराज! म्हणतात. आठ-नऊ वर्षापर्यंतची मुलं अक्षरशः भोंगळी असत. मुली वयात येण्याच्या मार्गाला लागल्या म्हणजे त्यांना त्यांची फाटक्या चिंधीतून एखादा कळकट-मळकट, फाटका-तुटका गठुड्यातून धाबगा काढून वयात आलेल्या लेकीच्या अंगावर वस्त्र-अलंकार चढवायची. कमरेला गाठ मारुन त्यांच्या मांडीपर्यत कासाटा घालायचा. मरी आईला वाहिलेले खण घरात असायचे. मग त्याची चोळी घरीच मोठ्या धाग्याने शिवून त्या पोरीला घालायची झालं तारुण्यात आलेल्या कुमारीकेचा हा पेहराव. तसच मुलाच्या बाबतीत. त्यांना मात्र चार बोटं रुंदीची हातभर चिंधी मिळाली की काम भागलं. एक मात्र खरं की त्याच्या कमरेला करगोटा असला पाहिजे. करगोटा हा लुगड्याच्या काठाचा वळून केलेला असे. त्या करगोट्यालाही उवा-लिखांची हुळहूळ असायची''[४]

जनावरांपेक्षा वाईट असलेली अवस्था. या अवस्थेला जबाबदार असणाऱ्या विषम समाजव्यवस्थेबद्दलची चीड लेखिकेने अशी व्यक्त केली आहे. ''इतका तर हा समाज बिगर शेपटाच्या जनावरासारखा होता. त्यांना फक्त हातापायाच्या घडणीत माणूस म्हणायच, नाहीतर निव्वळ जनावरच ती. जनावरं झाली कशी आणि त्यांना जनावरांचं वागणं दिलं कुणी? सवर्णांनी आमची माणसाची बुध्दी गायबच केली. बँक जसे त्यांच्या अंगणातल्या गोठ्यातला कडबा खाऊन रात्रंदिवस राबत होते, त्यांच्यापेक्षा गहन परिस्थिती आमची. त्यांना तर कष्ट करून पोटभर कडबा खायला मिळे आणि मालकाच्या अंगणात रहायला जागा असे. ह्यांच्याहूनही आमची भिन्न परिस्थिती. गावानं गावाच्या खाली उकिरडे केलेले, ती आमची जागा, त्यात आमची खोपटं. त्या उकिरड्यात टाकून दिलेल्या जनावरांचे आम्ही मालक. कुत्र्या-माजरांना, घारी-गिधाडांना लचके तोडता तोडता हाकलून देऊन आम्ही आमचा हक्क बजावीत असू. एक ना दोन अनेक संकटांनी आम्हाला गुरफटून टाकलं होतं. अंधारकोठडीत टाकलं होतं.'' [५]

अस्पृश्यता या विकृत प्रथेचे चित्रण बेबी कांबळे यांनी काही प्रसंगाद्वारे केले आहे. त्या कन्या शाळेत शिकायच्या तेव्हांचा अनुभव त्या कथन करतात. ''मुलींचे घोळकेचे घोळके पाण्याच्या नळावर आडवे व्हायचे आणि आम्हाला टाकून फेकून बोलणं ऐकावयाचे. '' इश्श, या महारड्या तर फारच शिष्ट पाण्याच्या नळाला शिवल्या आता आपण कुठं पाणी प्यायचं? यांना मुळी अक्कलच नाही.'' दुसरीने म्हणावं, ''अग मला तर घरी गेल्यावर आंघोळ केल्याशिवाय घरातच घेत नाही. अगं आम्हाला सारखं रामाच्या देवळात जावं यावं लागतं. आता काय करायचं? आपण कुठं पाणी पिणार म्हणून चिडून आमच्या अंगावर दगडमाती टाकायच्या, डोळ्यात माती फेकायच्या. मग मात्र आम्ही चिडायचो आणि खऱ्या त्वेषाने त्यांची दाणादाण करुन टाकायचो.''[६]

गावात जर कुणाचे लग्न किंवा इतर सण, समारंभ असायचे तेव्हा सर्वांची जेवणे झाल्यावर दलित समाजाला शेवटी खरकटे खावे लागत, परंतु पोटाच्या भुकेला कसाला आला स्वाभिमान ह्या गोष्टींनी बेबीताई दुःखी होताना दिसतात

मेलेली जनावरे शेतात ओढून नेणे, तेथे त्यांचे तुकडे करुन वाटप करणे घरी आणून खाणे इतकी वाईट अवस्था दलित समाजाने सहन केली हे "जिण आमुच" मधुन दिसून येते.

दलितांचा जसा मेलेल्या जनावरांच्या मुडद्यावर हक्क असे तसाच त्या मेलेल्या माणसाच मुडद्यावर हक्क असे, असे त्या सांगतात. गावात माणूस मेला रे मेला की, पहिला धावपळ गावकिच्या दलितांची मग उन,वारा,पाऊस काहीही असो, सगळे सहन करत त्यांनी त्या-त्या गावाला जाऊन निरोप देणे, दुखवट्याचा निरोप दिला तर पुन्हा त्या घरातील बायकांनी त्या दलित व्यक्तीचा उध्दार करावा, त्यांना ह्या सर्व वास्तवाचे दु:ख वाटते. याच पार्श्वभुमिवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री मुक्तीचा जाहिरनामा म्हटले जाणारे हिंदु कोड बील संसदेत सादर केले, ही गोष्ट त्यांना महत्त्वाची वाटते. या बिलामुळेच आपण लिहु शकलो असे नमुद करतात. त्या म्हणतात, " हिंदु कोड बिलाला जन्म देणारा विश्वकर्मा, दु:खकर्ता, नितीपुत्र माझा भिमराज या भिमराजाच्या स्फुर्तिनेच आज कसं का होईना माझी वेडीवाकडी लेखणं चालली आहे सत्य हा जीवनाचा गाभा आहे."[७] पुढे त्या काव्यपंक्तीच्या आधारे आपल्या भावना स्पष्ट करतात.

"माझ्या जवळ आहेच काय काय वाहू भिमा तुला,
तुझ्याच चरणी वहाती पुष्प फोडली वाचा दु:खाला,
फुल वाहते एक एक सगळे स्फुलिंग दु:खाचे,
डोळ्यातून पडते थेंब, धुते पाय भिमा तुझे,
आत्म्यातून भडकती आग, त्याचीच पेटवली ही ज्योत,
धडधडत्या या ज्योतीतून बुध्द, भिमच दिसतात."[८]

वरील काव्यपंक्तीतुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधी लेखिकेच्या मनातील आदर भक्तीचे रुप धारण करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "हिंदु कोड बील" आम भारतीय स्त्री नजरेसमोर सादर केले. इतर सर्वसाधारण स्त्रियाप्रमाणेच दलित स्त्रीच्या मनातही बेबीताई करतात आपल्या लेखनाविषयीच्या भूमिकेबाबत त्या म्हणतात, "मला साहित्य वगैरे काहीही कळत नाही, मग मी का लिहिलं? तर आधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणं ऐकूण स्वत:चे आयुष्य घडवले पाहिजे ही जाणिव झाली. स्वत:चा स्वतंत्रपणे व्यवसाय सुरु करु लागले, मग पुस्तकांशी सहज संबंध आला. रद्दीच्या दुकानामार्फत लिहायला- वाचायला येत होते. सहज पुस्तकातील वाचायचे, लक्षात आलं की हे जे आपण बोलत असतो तसंच लिहिलय मग वाटल आपण ही लिहून पहावे म्हणून लिहायला लागले."[९] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणामुळे त्यांच्या जिवनाची जडण-घडण झाली हे 'जिण आमुचं' मधून दिसून येते.

समाजातील ही अस्पृश्यता मन उद्विग्न करते. महार समाज जिवनात आणि बेबींताईंच्या वैयक्तिक जीवनात अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मोठे स्थान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल लिहित असतांना बेबीताईंच्या भाषेची सहजता कमी होऊन प्रबोधनाचा सूर उमटायला लागतो. कलेच्या दृष्टीने हा दोष वाटत असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या कडून जीवन संपूर्ण निराळ्या पातळीवर आणून ठेवणारी विचारप्रणाली बेबीताईं यांना मिळाली ही गोष्ट त्यांच्या बदललेल्या शैलीमध्ये प्रकर्षाने जाणवते.

बेबी कांबळे यांच्या जीण आमच या आत्मकथनातून दलित समाजाची आर्थिक परिस्थिती किती बिकट होती. त्यामुळे संपुर्ण समजा कसा दारिद्री आहे हे दिसून येते गरीबीमुळे स्त्रियांना कशा प्रकारे हाल उपेक्षा सहन कराव्या लागल्या हे दिसते. जेव्हा एखादी स्त्री बाळंतीण व्हायची तेव्हा त्या बाईला झोपडीत पेज पाजण्याइतकही अन्न नसे. मुल पोटातून बाहेर आल्यावर बायकाचं पोट एकदम रिकाम होत. त्यात एखाद्या मऊ पदार्थाची भर घालावी लागते. परंतु माहेरची गरीबी एवढी की पोटभर अन्न ही मिळणे मुश्किल होत असे. गरिबी इतकी बेसुमार होती की, चार-चार दिवस अन्न मिळत नसे. बेबी ताई यांनी त्यांच्या आत्मकथनातून तशी उदाहरणे दिली आहेत. भुकेसाठी कशा प्रकारे दलित समाज संघर्ष करीत होता. बेबी ताई लिहितात की, दोघा नवराबायकोंनी बोंड काढण्याच साहीत्य घेवून मळशीला जाब. त्यान शेलकी शेलकी बोंड पाडत रहाव आणि तिन तरवड्याच्या पाल्यान घोसळत रहाव. एका झटक्यात बोंडांनी हारा गच्च भरायचा. हाऱ्यात बोंड गच्च भरल्यावर ती इतकी सुरेख दिसायची कि त्या बोंडासारख रंगरुप गोडी कुठल्याही फळात नाही. हारा गच्च भरुन आणलेला दारातच उतरायचा. पोर लोळत पडलेली पटापटा उठून हाऱ्याला घेराव घालायची.[१०]

गरीब असल्यामुळे आम्ही अस्पृश्य झालो नसून अस्पृश्य ठरविल्यामुळे आम्ही गरीब झालो.[११] असे राजा ढाले यांनी म्हटले आहे, ते अर्थपूर्ण आहे. गरीब झालेला अस्पृश्य भाकरीसाठी मोताद झालेला दिसतो. गरीब याचा या ठिकाणी 'कमी पैसे असलेला इसम' असा अर्थ नसून, अक्षरश: वैराण जीवन वाट्याला आलेला, अपमानित, दमडी जवळ नसलेला, दमडी कमविण्याचाही हक्क नाकारला गेलेला, जातीच्या पोलादी चौकटीत आत्यंतिक नीच स्थान असलेला व्यक्ती, अशा व्यक्तींचा समूह म्हणजेच ढाले यांना अभिप्रेत असलेला 'गरीब अस्पृश्य' म्हणता येईल.

**सारांश**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये बेबीताई यांची समंजस वृत्ती ही जाणवते व त्यांचा डोळसपणाही दिसून येतो. दलित समाजातील कारुण्याचे वर्णन करतांना सौ. बेबीताई कांबळे यांनी किंचित विनोदाची उबही मधून मधून दिलेली आहे. या सर्व निवेदनात विद्रोहाचा सुर जसा दिसत नाही तसाच अतिरेकीपणाही नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी लिहितांना त्यांच्या भाषेला प्रबोधनाचा सुर प्राप्त होतांना दिसतो. लेखिकेचा पिंड ललित लेखिकेचा नसून समाजशास्त्रज्ञाचा आहे. स्वत:च्या समाजाचे डोळसपणे आणि सहानुभूतिने केलेले निरीक्षण हे त्यांनी त्यांच्या लिखाणातून मांडल्यामुळे 'जिण आमुचं' ही एक अनमोल खाण आहे. जिणं आमुचं या पुस्तकातील लिखाण हे भोगलेल्या अवस्थेतून निर्माण झालेला शब्द न शब्द अंतरातून निघालेला सत्यांचा अंकुर होय. जिणं आमुचं मधुन मुख्यत: दलित स्त्री जातीच्या जीवनाचे चित्रण आहे. त्यावेळची दलित स्त्रियांची अवस्था किती भयावह होती हे बेबीताई यांच्या जिणं आमुच मधुन दिसून येते.

**संदर्भ सूची**


१. प्रा. सुभाष वाघमारे माझ्या जन्माची चित्तर कथा-एक अभ्यास (एम.फील, अप्रकाशित प्रबंधिका),मुबंई विद्यापीठ.

२. बेबी कांबळे, जिण आमुचं, मानसन्मान प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती ९ मे १९९०, मॅक्सीन बन्सल यांची प्रस्तावना, पृ.क्र.३.

३. मदन कुलकर्णी, 'साहित्य ग्रामीण आणि दलित' पहिली आवृत्ती, विजय प्रकाशन नागपूर,सप्टे.२००२.

४. बेबी काबंळे, 'जिणं आमुचं', सुगावा प्रकाशन पुणे, तीसरी आवृत्ती, १४ एप्रिल २००८.

५. तत्रैव पृ. ९

६. तत्रैव पृ.२९, ३०

७. तत्रैव पृ. ३०

८. तत्रैव पृ.११०

९. तत्रैव पृ. ६०

१०. तत्रैव पृ. ६०

११. राजा ढाले, 'अस्मितादर्श' ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९९५.